INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# प्रतिभावंत साहित्यिक सरदार जाधव : व्यक्तित्व आणि कर्तृत्त्व

# (Genius writer Sardar Jadhav: Personality and Achievements)

**डॉ. रमेश जाधव**
प्राध्यापक,
मराठी भाषा व वाङ्मय विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: prof.rameshjdhav2021@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2024-13541246/IRJHIS2402019

**प्रास्ताविक :**

१९९० नंतर मराठी साहित्याच्या क्षेत्रांत खूप विधायक स्थित्यंतरे घडलेली दिसतातसाहित्य, समाज आणि संस्कृतीला सबळ करणाऱ्या पुष्कळ गोष्टी या काळात झालेल्या आहेत. दलित, ग्रामीण आणि आदिवासी साहित्याची चळवळही याच कालखंडात फोफावली. खेड्यापाड्यातील उपेक्षितांना लेखन बळ देण्याचे कार्य उपरोक्त चळवळीने केले लहानमोठ्या शहरात व गावात त्यांनी साहित्य संमेलने व लेखक, वाचक मेळावे आयोजित करून वाचन व लेखन संस्कृती वृध्दिंगत केली साहित्य विषयक अभिरुची संपन्न करून तरुण पिढीतील उमद्या लेखकांना लिहिते करून स्वभान दिले राज्य सरकारनेही नवोदित लेखकांना उत्तेजन मिळावे म्हणून 'साहित्य आणि संस्कृती' मंडळाची स्थापना करून त्याद्वारे नवोदित लेखकांच्या पहिल्या कलाकृतींना अनुदान देऊन प्रसिध्द करण्याचे ठरविले. नवोदित लेखकांना उत्तेजन मिळावे म्हणून पुरस्कार देण्याची सुप्रथा आरंभ केलीसाहित्य अकादमीच्या माध्यमातून नवोदित लेखकांच्या साहित्यावर चर्चासत्रे परिसंवाद, कविसंमेलन, नवलेखक लेखन कार्यशाळांचे मोठ्या प्रमाणात याच काळात आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील बहुजनांच्या वेगवेगळ्या वाङ्मयीन नियतकालिकांनी नवोदितांच्या साहित्यांना ठळक प्रसिध्दी देऊन त्यांना पंख दिले वर्तमान पत्रे व वाङ्मयीन नियतकालिकांनी नवोदित लेखकांच्या साहित्य लेखनाची कदर करून त्यांचे लेखन ठळकपणे छापले व त्यावर परीक्षणेही लिहून घेऊन प्रसिध्द केलीत. अशा वाङ्मयीन पर्यावरणाचे अपत्य असलेली प्रस्तुत कालखंडातील अनेक लेखकमंडळी सांगता येतीलत्यापैकी एक नाव सरदार जाधव यांचे आवर्जुन घ्यावे लागते. व्यवसायाने चित्रकार असणारे सरदार जाधव सव्यसाची ललित लेखकही आहेत. कथा व नाट्य लेखनासोबतच त्यांनी कादंबरीच्या प्रांतातही मुशाफिरी केली आहेअनेकांच्या कलाकृतींना त्यांनीसुबक मुखपृष्ठेही तयार करून

दिलेली आहेत. अशा या चित्रकार ललित लेखकाचे 'कोयता' व 'दात' या दोन कादंबऱ्या आणि 'माणसं अन् कणसं हा कथासंग्रह व 'नागतांडव' हे नाटक प्रसिध्द झालेले लक्षात येतात. २०१२ मध्ये नांदेड येथे संपन्न झालेल्या 'साद' संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे मराठी साहित्य जगतातील मौलिक असा 'महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार' आणि 'म.सा.प. (औरंगाबादचा) पुरस्कार' देऊन त्यांचा यथोचित गौरवही करण्यात आला आहे. याचाच अर्थ सरदार जाधवांच्या साहित्यलेखनाला रसिक मान्यतेबरोबरच राजमान्यताही प्राप्त झाली आहे. परंतु समीक्षक मान्यता अजूनही मिळालेली दिसत नाही म्हणून या प्रतिभाशाली लेखकाचा साहित्यसंसार यापुढे तरी उपेक्षित ठरू नये म्हणून हा अल्पसा प्रयत्न. जाधवांच्या आतापावेतो प्रसिध्द झालेल्या समग्र साहित्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे नमूद करता येईल

**विषय विवेचन :**

**१. कादंबरीलेखन (कोयता) :**

सरदार जाधव यांची ‘कोयता’ ही पहिली कादंबरी आहे. 'कोयता' ही कादंबरी १९९४ मध्ये प्रसिध्द झाली. या कादंबरीच्या आतापर्यंत दोन आवृत्या प्रसिध्द झाल्या आहेत 'कोयता' या कलाकृतीस म.सा.प. औरंगाबादचा 'नरहर कुरुंदकर' व रोहमारे ट्रस्टचा 'बोरा' पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रस्तुत कादंबरीवर ‘कोयता’ लघुचित्रपटही प्रसिद्ध झाला असून या चि त्र पटाचे निर्माते आकाश पाटील हे असून दिग्दर्शन सतीश बोरा यांनी केले आहे प्रस्तुत कादंबरी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एम. ए. प्रथम वर्ष मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातही २०२२ साली लावली होती. १२८ पृष्ठांची ही कादंबरी ऊसतोड कामगार, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर व भटक्या जमातींच्या जीवनाचा आलेख साकारते. ही संपूर्ण कादंबरी बोलीभाषेत आकाराला आली आहे. हे या कादंबरीचे वेगळेपण होय. प्रस्तुत कादंबरीत प्रथमपुरुषी निवेदन पध्दतीचा वापर कथानकाला आकार देण्यासाठी लेखकाने सुयोग्यरित्या केलेला आहे. आशय व अभिव्यक्तीच्या संदर्भातील लक्षणीय प्रयोगही प्रस्तुत कादंबरीत करण्यात आले आहेत जसे पत्रात्मक पद्धत, लोककथा व लोकगीतांचा मार्मिक वापर इत्यादी. १९७१-७२ मध्ये उद्भवलेल्या दुष्काळामुळे मराठवाड्यातील ग्रामीण जनतेची खूपच दयनीय व बिकट अवस्था झाली होती त्यामुळे मराठवाड्यातील गरीब शेतकऱ्यांना शेतमजुरांना पोट भरण्यासाठी परागंदा व्हावे लागले होते याचे खूप विदारक चित्रण प्रस्तुत कादंबरीत करण्यात आलेले दिसते. शिवाय दुष्काळात सावकार खेडूत शेतकऱ्यांना कसे लुबाडतात, जमिनी व मौल्यवानवस्तू कशा कमी दरात गहाण ठेवतात याचेही चित्रण लेखकाने येथे वास्तवरूपात साकारलेले आहे. 'कोयता' मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड परिसरातील कष्टकऱ्यांचे जीवन अधोरेखित झाले असले तरी उदरनिर्वाह करण्यासाठी ही माणसं पश्चिम महाराष्ट्रात ऊस तोडीचे रोजगार मिळविण्यासाठी गेल्यामुळे तेथील समृध्द व संपन्न परिसराचे आणि संस्कृतीचे दर्शनही येथे घडते. या कादंबरीत निवेदकाचा / लेखकाचा जीवनप्रवास आविष्कृत झाला असला तरी प्रस्तुत कादंबरी आत्मकथनपर रूपसौष्ठवाची कादंबरी वाटत नाही. ग्रामीण वास्तवापासून या कादंबरीचा आशयपट व अभिव्यक्ती तिळमात्रही ढळताना दिसत नाही खेडूत व्यक्तीचे सुख-दु:ख, ऊस कामगारांची आणि ऊस उत्पादक व अल्पभूधारक शेतकऱ्यांची, शेतमजुरांची व्यथा साकारण्यात लेखक प्रस्तुत कादंबरीत खूप यशस्वी झालेले आहेत लेखकाने ग्रामीण माणसांच्या जीवनाशी जोडले गेलेले व त्यांना भेडसावणाऱ्या

अनेक प्रश्नांचा आणि समस्यांचा सूक्ष्मपणे प्रस्तुत कादंबरीत वेध घेतला आहे हे या कादंबरीचे सामर्थ्य होय. ऊसतोड कामगारांचे, शेतमजुरांचे आणि कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे नि गावोगाव भटकून उदरनिर्वाह करणाऱ्या भटक्या जमातींचे कष्टद व खडतर जीवन या कादंबरीचा मूळ आशयपट आहे हा आशय सूक्ष्मपणे चिमटीत पकडण्यात लेखक यशस्वी झालेला दिसतो. रंजकतेला या कादंबरीत मज्जाव आहे केवळ समकालीन वास्तवाचा व्यापक पट येथे साकारला आहे. 'कोयता' हे या कादंबरीला योजलेले शीर्षकही समर्पक वाटते. 'कोयता' हे ऊसतोड संस्कृतीचे संसूचन करते त्यातून एका कष्टकरी समुदायाचे जीवन दर्शन घडते.

'कोयता' ही कादंबरी आशयाच्या दृष्टीने जशी कसदार वाटते तशीच ती व्यक्तिरेखांच्या बाबतीतही लक्षवेधक झालेली दिसते.

पहाडू, पार्वती, सोना मांगीण, ल्हानी मावशी, ल्हाना मामा, सुपडूदादा, बाळ्या सुतार, नागो घिसाडी, चंदरभागा काकू, किसनदादा, मुकुंदा वाळकू, निमी, नंदी, निवेदक सदा, भीमा, किसन, बाळासाहेब, पहाडू भाऊ, जानूकोष्टी, ढोल्या पाटील, यमी, कडूबा, जानकुदादा, गरीब शेतकऱ्यांना लुबाडणारा दादा सावकार, मदतगार उमराव, सांडू वारिक, पातळयंत्री मात्र प्रामाणिक गुरुजी, कोंडा कोळीण, निवेदकाचा शाळकरी मित्र पंडित, स्वतःची शेती विकून भिकार जीवन जगणारा रामसिंग, मांत्रिक यादू महार, अपघातात जीव गमावणारा जानकू आदी स्त्री - पुरुष व्यक्तिरेखा 'कोयता' च्या कथानकाला व आशयाला खूप धारदार व वेधक बनवितात. या प्रत्येक व्यक्तिरेखांना स्वतःचा चेहरा आहे. व्यक्तिरेखा चित्रित करण्यात लेखक कमालीचा यशस्वी झालेला दिसतो. अत्यंत बारकाईने प्रत्येक व्यक्तिरेखेचे स्वभावगुणविशेष कादंबरीकारांनी अधोरेखित केले आहे प्रस्तुत कादंबरीतील व्यक्तिरेखा रंगरंगोटी केल्यासारख्या कृत्रिम वाटत नाहीत. त्या वास्तवातल्या वाटतात. कादंबरीच्या कथानकाला प्रवाही करतात. हे या कादंबरीतील व्यक्तिरेखांचे लक्षणीय विशेष होय.

'कोयता' मधील वातावरण हा ग्रामीण जीवनाचा आरसा आहे. वातावरण निर्मितीसाठी लेखकाने खूप परिश्रम घेतलेले दिसते. प्रस्तुत कादंबरीत बेलापूर, डिग्रस, कोळपेवाडी, कोपरगाव, सिल्लोड, औरंगाबाद, वढद आदी स्थळांचा निर्देश झालेला आहे. ही स्थळे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. त्यामुळे प्रस्तुत कादंबरीत दुष्काळी मराठवाडा आणि समृध्द पश्चिम महाराष्ट्राचा परिसर चित्रित झालेला आहे. त्या अनुषंगाने तिथली लोकसंस्कृती, कृषिसंस्कृती, लोकमानस, बोलीभाषा, व्यक्तिनामे, वाक्प्रचार, लोकम्हणी, लोककथा, लोकगीते आदी घटकही येथे साक्षात झालेली लक्षात येतात.

'कोयता' कादंबरीच्या अभिव्यक्तीचा वेध घेता असे जाणवते की, या कादंबरीत मराठवाडी ग्रामीण बोलीभाषेचा संवाद व निवेदनासाठी सुयोग्य वापर केला आहे. ही संपूर्ण कादंबरी बोलीभाषेत साकारली आहे कादंबरीतील वाक्यरचना खूप लहान-लहान असल्यामुळे प्रस्तुत कादंबरीची भाषाशैली लीळाचरित्रासारखी वाटते कादंबरीतील वर्णने, अत्यंत सूक्ष्मणपणे केल्यामुळे म फुले यांच्या लेखनशैलीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. ही कादंबरी ग्रामीण लोकजीवनाचा पट उलगडत असल्यामुळे मराठवाड्यातील कृषीसंस्कृतीतील अस्सल ग्रामीण शब्दकळा येथे स्वाभाविकपणे आलेली दिसते. उदा. गराडा, निवद, जहेर, पळहाटी, इंधन, वावर, बंधाऱ्या, गचकला, जित्राब, ढिलपी, कुंडभरल्या, इरलं, सुडी, जिंदली आदी शब्दकळा याची प्रचिती

घडवितात. अस्सल मराठवाडी ग्रामीण शब्दकळेसोबतच मराठवाड्यातील लोकजीवनातील वाक्प्रयोगही या कादंबरीत ठायीठायी आढळतात. उदा. जिवात जीव आला, तावं तावं म्हणाली, तोंडाला पाणी सुटलं, पोटात केळ कालवले, गंगेत घोडे न्हाले, पाताळयंत्री आदी वाक्प्रचार याची प्रचिती देतात. वाक्प्रचाराबरोबरच तुरळक स्वरूपात लोकम्हणींचा वापर येथे झालेला दिसतो. जसे, हाडधन ते काडधन असतं, गेला महार अन केला जोहार इत्यादी म्हणीं कादंबरीच्या अभिव्यक्तीस समृध्द करतात. ग्रामीण विशेषणे, उपमा, अलंकार, मिथके विशिष्ट आवाज, सादशब्द आदींचा कादंबरीची भाषा-शैली संपन्न करण्यासाठी लेखकाने समर्थपणे वापर केलेला दिसतो. उदा. **विशेषण: ढवळाफट्ट**, खब्बड बैलजोडी, काळ्या कुळकुळीत रंगाचा, उंचीताड माणसं, हिरवीगार, तगडा माणूस इत्यादी. **उपमा** : बुरुजावरचा पिंपळ धनावरच्या नागासारखा सावली धरून उभा असायचा (पृ.क्र.११ कोयता), बाभळीच्या ढिलपीसारखा (पृ.क्र.३१, कोयता) वाळकू काका तंट्याचं सोंग घेऊन आलाय रघ्यरंदावानी (पृ.क्र.३६ कोयता), ढोलकी येवढालं एक-एक डांगर (पृ.क्र.७८ कोयता) आदी. **आवाज :** गुऱ्हाळाचा 'टुक-टुक-टुक' आवाज येत न्हाई (पृ.क्र.८१) क्यांव-क्यांव-कुत्र्याच्या पिल्लांचा आवाज, फटऽऽऽ फटऽऽऽ फटफटीचा आवाज इ. **मिथक :** सीता, तंट्या इत्यादी. **अलंकार :** उपमा, उत्प्रेक्षा, श्लेष आदी अलंकारांचा वापर करण्यात आला आहे उदा. "जमिनीतून कोंभ टरारून वर आले अन् पहाऱ्यावरच्या कुत्र्याला कुठे बोंबिलाचा वास यावा, तसं आभाळाला झालं." (पृ.क्र.७३) लाल-पिवळी फुलं फडका-फडकी नेसल्या पोरींच्या येणीच्या रेबिनींवाणी दिसायल्याली." (पृ.क्र.१९) आदी वाक्ये त्याची साक्ष घडवितात.

एकंदरीत 'कोयता' ही सरदार जाधव यांची कादंबरी आशयाभिव्यक्तीच्या दृष्टीने संपन्न झाली आहे प्रस्तुत कादंबरीत ऊसतोड कामगार, कास्तकार, अल्पभूधारक शेतकरी यांच्या जीवनाचे चित्रण झाले असले तर सदर कादंबरीत डोंबारी, राजपूत भामटा, घिसाडी आदी भटक्या जमातींचेही दर्शन घडते. त्यामुळे ही भटक्या समाजातील लेखकांची पहिली भटक्या-विमुक्त समाज जीवनाचे वेध घेणारी कादंबरी ठरते. अशा स्वरूपाच्या या कादंबरीचे **पुढील गुणविशेष लक्षात येतात.**

- ही संपूर्ण कादंबरी मराठवाडी बोलीभाषेत अभिव्यक्त झाली आहे.
- 'कोयता' ही कादंबरी वास्तवतेचा मूर्तिमंत उदाहरण वाटते
- या कादंबरीमधील व्यक्तीरेखा ठसठशीत व लक्षवेधक वाटतात
- ग्रामीण लोकमानस, लोकगीते, लोककथा यांचा मार्मिक वापर या कादंबरीत झालेला आहे
- काही नवे प्रयोगही करण्यात आले आहे. त्यामुळे ही प्रयोगशील कादंबरी ठरते.
- विमुक्त भटक्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे खूप शब्दकळा या कादंबरीत आलेल्या दिसतात.

**२. दात (कादंबरी) :**

सरदार जाधव यांची ही दुसरी कांदबरी२००९ मध्ये प्रकाशित झाली आहे. या कादंबरीस महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने दिला जाणारा 'वि.स.खांडेकर' हा मानाचा पुरस्कार २०१० -११ मध्ये मिळाला आहे. कन्नड भाषेतही प्रस्तुत कादंबरी अनुवादितही झालेली आहे 'दात' या कादंबरीचे कथानक ग्रामीण जीवनाचा पट उलगडते, असे जाणवत असले

तरी कादंबरीचा कथाशय वेगळाच आहे प्रल्हाद मुळे पाटील या खेडूत सज्जन व्यक्तीची स्थिती गरिबीमुळे कशी दयनीय बनते परिस्थितीमुळे तो कसा खंगतो मानसिक रोगी होतो. त्याला पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्यामुळे तो ठार वेडा होतो. पिसाळतो, त्याचा स्मृतिभ्रंश होतो गावकरी त्यामुळे चिंतित होतात या पिसाळलेल्या माणसाचा गावाला धोका ठरू शकतो म्हणून जिवंत माणसाला मारण्याचा निर्णय गावकरी घेतात. असे या कादंबरीचे कथानक आहे. या ठिकाणी एक नावीन्यपूर्ण विषय कुशलतेने लेखकाने चित्रित करून मराठी कादंबरीला नवी दिशा व निराळी वाट दाखविली आहे या कादंबरीच्या व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत विचार करता असे निदर्शनास येते की, यात पात्रांची फारशी गर्दी नाही. नायक-नायिका, सृष्ट-दुष्ट पात्रे असा रंग आढळत नाही घटना आणि प्रसंगही फारसे लक्षवेधक वाटत नाहीत. सर्वच स्त्री-पुरुष पात्रे लेखकांनी कसदारपणे साकारली आहेत प्रल्हाद मुळे पाटील हा साधा भोळा फोबीया झालेला कास्तकार या कादंबरीतला मुख्यपात्र आहे त्याच्या जोडीला त्यांची सोज्वळ पत्नी कांता, मुलं वंदी व नंदया भाऊ माणिक, प्रल्हादचा मित्र नाथाभाऊ, गावातील बडे आसामी सखाराम व दत्तू पाटील, सभापती अनुराधाबाई, शिकलेली सरला व पिठाची गिरणी चालवून संसारगाडा ओढणारा तिचा नवरा रघू, कर्तव्य दक्ष डॉक्टर आदी स्त्री-पुरुष पात्रे प्रस्तुत कादंबरीच्या कथानकास सधन करतात या कादंबरीची शैली काव्यमय असून 'फ्लॅशबॅक' तंत्राचा येथे वापर झाला आहे. मनोविश्लेषणपध्दतीचाही येथे वावर दिसतो. निवेदनासाठी प्रमाण व संवादाकरिता लोकभाषेचा समर्पक उपयोग लेखकाने केलेला आहे. अल्प-स्वल्प प्रमाणात म्हणी, वाक्प्रचार, अलंकार, उपमा, प्रतिमा, विशेषणे आदींचा उपयोग करून कादंबरीकारांनी भाषाशैली घडविली आहे. या कादंबरीची भाषाशैली सुबोध आणि प्रासादिक वाटते

सारांश, या कादंबरीचा विषय नावीन असला तरी लेखक ज्या समुदायाचे घटक आहेत भटक्या-विमुक्त समाजाचे दर्शन मात्र येथे

घडत नाही. अशा आशयाच्या या कादंबरीचे ठळक विशेष पुढीलप्रमाणे नमूद करता येतील

- या कादंबरीला प्रस्तावना व मनोगत नाही.
- प्रस्तुत कादंबरीची भाषा शैली काव्यमय वाटते
- दातमध्ये एक नावीन्यपूर्ण विषय मोठ्या ताकतिने अभिव्यक्त केला आहे.
- कृषिसंस्कृतीचे अनेक संदर्भ या कादंबरीत व्यक्त झाले आहेत
- या कादंबरीचे 'दात' हे शीर्षक सूचक व समर्पक वाटते.
- सदर कादंबरीत मनोविश्लेषण तंत्राचा व प्लॅशबॅक पध्दतीचा लेखकाने कुशलतापूर्वक वापर केला आहे

**३. कथालेखन (माणसं अन् कणसं):**

'कोयता' व 'दात' कादंबरीमुळे मराठी साहित्याला परिचित असणाऱ्या जाधवांचा 'माणसं अन् कणसं हा पहिला - वहिला कथासंग्रह १९९४ मध्ये कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद यांनी प्रसिध्द केला आहे अवघ्या बारा कथांचा हा संग्रह ग्रामीण लोकांच्या व्यथा व वेदना अधोरेखित करणारा एक महत्त्वाचा लघुकथा संग्रह आहे 'राजपूत भामटा' समाजाचे जाधव त्यांच्या कथांमधून

स्वसमाजाचे दु:ख बाजूला सारून ग्रामीण परिसरातील समस्त कष्टकऱ्यांच्या अवहेलना अधोरेखित करतात हे त्यांच्या कथा लेखनाचे विशेष होय. मराठवाड्यातील परिसर, माणसं, त्यांच्या प्रथा-परंपरा, जगणं त्यांच्या अवीट बोलीभाषेसह त्यांनी चित्रित केल्याचे लक्षात येते. संवादासाठी मराठवाडी रांगडी बोलीचा आणि निवेदनाकरिता प्रमाण मराठीचा त्यांनी चपखलपणे वापर केलेला आहे. त्यांच्या प्रत्येक कथेला कथानक असते. कथांचे कथानक व कथेतील व्यक्तिरेखा ग्रामीण संस्कृतीशी इमान राखताना दिसतात. त्यांच्या कथा-दीर्घ बांध्याच्या असतात. त्यांना जे सांगायचे ते नेमकेपणे मांडतात त्यामुळे त्यांची कथा वाचकांवर चटकन परिणाम करते व त्यांच्या मनाची पकडही घेते. मराठवाडी वाक्प्रचार व लोकसंकेत आदींचा मार्मिकपणे उपयोग केल्यामुळे प्रस्तुत संग्रहातील कथा भाषिकदृष्ट्या मौलिक झालेल्या आहेत. मराठवाड्यावर बरेच दिवस निझामाचे राज्य होते. त्यामुळे इथली राजभाषा उर्दू होती परिणामी लोकांच्या दैनंदिन व्यवहारात अनेक उर्दू शब्द मिसळले ते कायमचेच. प्रस्तुत संग्रहातही अनेक कथांमधून उर्दू शब्दकळा पात्रांच्या संवादात व्यक्त झालेले दिसतात त्यामुळे उर्दूमिश्रित मराठी असे या संग्रहातील भाषेचे स्वरूप बनले आहे. 'माणसं अन् कणसं', 'जित्राब', 'सापळा', 'वैशाड' या प्रस्तुत संग्रहातील लक्षवेधक कथा आहेत भटक्या-विमुक्तांचे जीवन प्रस्तुत संग्रहातील कथांमधूनअधोरेखित झालेले नसले तरी या कथांचे मोल कमी होत नाही. ग्रामीण परिसरातील गरीब माणसांचे दारिद्र्यमय जीवन यातून व्यक्त झाले असल्यामुळे या संग्रहातील कथा खूप वास्तव व प्रभावी वाटतात.परिणामतः या संग्रहाचे मोल शतगुणित होते. नवदोत्तर मराठी लघुकथेच्या प्रवाहास जाधवांच्या प्रस्तुत संग्रहाने निश्चितच मौलिक योगदान दिले आहे. प्रवाही केले आहे.

प्रस्तुत लघुकथासंग्रहाचे शीर्षकही खूप बोलके असून कृषीसंस्कृतीचे ते संसूचन करते.कथाशय आणि लेखनतंत्र या अंगाने प्रस्तुत संग्रहातील कथा खूपच वेधक ठरलेल्या आहेत.

**४. नाट्यलेखन (नागतांडव) :**

सरदार जाधव या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या प्रतिभावंत लेखकाचे 'नागतांडव' या शीर्षकाचे एकमेव नाटक प्रसिध्द आहे. प्रस्तुत नाटकाची पहिली आवृती किर्ती प्रकाशन औरंगाबाद यांनी२ ऑक्टोबर २००६ रोजी प्रकाशित केली आहे. 'नागतांडव हे दोन अंकी नाटक असून या नाटकाच्या माध्यमातून 'बारी' या नामशेष होत चाललेल्या पारंपरिक लोककलेमध्ये नाग मनुष्याच्या अंगात कसा भिनतो याचे नाट्यात्म रीतीने दर्शन घडविले आहे, नागनृत्याचा तांडव व लोकगीतांचा समुचित आविष्कार,लक्षवेधक मुखपृष्ठ आणि सूचक शीर्षक हे या नाट्यकलाकृतीचे विशेष आहेत. सदर नाटकातून वर्तमान ग्राम जीवनातील हुंडाप्रथा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पाणीटंचाई, बोथट मनोवृत्तीचे नेते व त्यांचे राज व समाजकारण, भ्रष्टाचार इत्यादी प्रश्न व समस्यांचा टोकदारपणे आविष्कारण या नाटकाद्वारे केले आहे. या नाट्यकलाकृतीचे कथानक केवळ 'बारी' या मराठवाडा व विदर्भातील ग्रामीण भागात प्रचलित असलेल्या पारंपरिक लोककलेचे दर्शन घडविते यापुरते सीमित नाही तर या लोप पावणाऱ्या लोककलेच्या माध्यमातून वर्तमान ग्रामीण जीवनातील ज्वलंत प्रश्न व समस्यांचा येथे परखडपणे नाटककारानी समाचार घेतला आहे. 'नागतांडव' हे सरदार जाधव यांचे पहिले व एकमेव नाटक असले तरी यात नवखेपणाच्या खुणा कुठेही दृष्टीस पडत नाहीत. वर्तमान स्थिती टोकदारपणे आविष्कृत करणारे कथानक, नाट्यरसिकांचे मन हेलावणारे पात्र चित्रण प्रभावी संवाद व घटना-प्रसंग, लोकनाट्य,

लोकगीत आणि पौराणिक आख्यायिकांचा प्रभावी वापर यामुळे प्रस्तुत नाटक लक्षवेधक व प्रायोगिक ठरले आहे असे मला वाटते.

सारांश, मराठवाडा व विदर्भातील ग्रामीण परिसरात रूढ असणाऱ्या 'बारी' या लोकनाट्याच्या माध्यमातून नाटककारांनी ग्रामजीवनातील नानाविध समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत नाटकाद्वारे केला आहे नाटकाचे कथानक, परिणामकारक व संवाद बोलीत असल्यामुळे खूपच प्रभावी वाटतात प्लॅशबॅक तंत्राचा वापर, लोकगीते व पौराणिक आख्यायिकांची नाट्यकथनासाठी खुबीने उपयोजन, हे 'नागतांडव' या नाटकाचे विशेष आहेत. प्रयोगमूल्य, नाट्यमूल्य आणि वाङ्मयमूल्य याचं भान व जाण असणारे 'नागतांडव' हे एक आगळेवेगळे नाटक वाटते. वर्तमान नाट्य चळवळीला मजबूत करून तिला अनोखा मुखवटा प्राप्त करून देणाऱ्या प्रस्तुत नाटकाचे मोल मान्य करावेच लागते. इतक हे नाटक प्रयोगशील व तंत्रदृष्ट्या सक्षम व सबळ झाले आहे नाट्यरचना तंत्राची कुशल जाण व भान असलेले जाधव म्हणूनच वर्तमान मराठी नाट्य सृष्टीतील महत्त्वपूर्ण नाटककार आहेत. प्रस्तुत नाटकाचे प्रयोग झाले पाहिजेत.

**समारोप व निष्कर्ष :**

नव्वदोत्तर पिढीतील सरदार जाधव हे महत्त्वाचे साहित्यिक आहेत. नव्वदोत्तरी मराठी साहित्याला गतीमान व सशक्त करण्यात त्यांचा निश्चितच मोठा वाटा आहे. कादंबरी, लघुकथा आणि नाटक या तीनही वाङ्मय प्रकारातून त्यांनी योगदान वेचले आहे. 'कोयता' व 'दात' या त्यांच्या दोन्ही कादंबऱ्या नवदोत्तरी मराठी कादंबरी वाङ्मयाच्या वास्तववादी प्रवाहाला बळकट करून समृध्द करणाऱ्या नक्कीच आहेत. 'माणसं आणि कणसं' हा त्यांचा एकमेव लघुकथासंग्रह मराठी लघुकथेचे पट बळकट करणारा संग्रह असून'नागतांडव' हे त्यांचे एकुलतेएक नाटक मराठी नाटकाच्या प्रयोगशील नाट्य चळवळीला सुदृढ करणारे आहे सरदार जाधव या बहुप्रसू लेखकांनी कथा, कादंबरी व नाटक हे तीनही साहित्यप्रकार खूप कसबीने हाताळले असून त्यात कुठेही नवखेपणाच्या खुणा आढळत नाही. आशय, अभिव्यक्ती, व्यक्तिरेखा वातावरण, घटना प्रसंग, संवाद आदी बाबतीत या कलाकृती लक्षणीय वाटतात. या कलाकृतींची शीर्षकं खूपच समर्पक आणि लक्षवेधक आहेत. जाधवांच्या लेखनाला वर्तमान जीवनाचा सुगंध आहे ते चित्रकार असल्यामुळे त्यांची लेखनशैल चित्रमय रूप परिधान करताना जाणवते. मराठवाड्यातील ग्रामीण बोलीचा खुबीने लेखनासाठी वापर केल्यामुळे भाषिक अंगाने जाधवांचे लेखन खूपच संपन्न झाल्याचे लक्षात येते.त्यांच्या साहित्याला लोक व राजमान्यता मिळालेली असली तरी मराठी समीक्षकांनी मात्र जाधवांच्या लेखनाची अक्षम्य हेळसांड केलेली आहे सरदार जाधव हे कोणत्याही साहित्य चळवळीशी जोडले गेले नसल्यामुळे त्यांच्या लेखनाकडे समीक्षकांचे दुर्लक्ष झालेले असावे असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) जाधव सरदार, कोयता - जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती-२००८.

२) जाधव सरदार, दात - जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद. प्रथमावृत्ती- २००९.

३) जाधव सरदार, माणसं अन् कणसं- कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती- १९९४

४) जाधव सरदार, नागतांडव - कीर्ती प्रकाशन औरंगाबाद. प्रथमावृत्ती - २००६.

५) डॉ. जाधव रमेश, भटक्या-विमुक्तांचे परिप्रेक्ष्य – गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद

६) डॉ. जाधव रमेश, विमुक्तरंग- गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद

७) डॉ. वासुदेव मुलाटे- मराठवाड्याची ग्रामीण कथा,

८) जाधव प्रमिला, कार्यकारी संपादक – गोरवाणी (त्रैमासिक).